**"ऑगस्ट २०१७" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ४ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभागातील प्रत्येक संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कामकाजाच्या कार्यपद्धतीचा आढावा घेऊन कार्यभार निश्चितीची मानके तयार करण्यासाठी सहसचिव (कार्यासन-१४, १४अ, १४ब), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे.
- दिनांक ११ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगानुसार अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना दिनांक १ जुलै २०१७ पासून घरभाडे भत्त्याचे सुधारित दर केंद्र शासनाप्रमाणे लागू करण्यात आले आहे.
- दिनांक ९ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील नाईक-१, शिपाई-२ व स्वच्छक-२ अशी ५ पदे निरसित करण्यात आली आहेत.
- दिनांक ९ ऑगस्ट २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये गट-अ मधील राज्य शासकीय अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्धतीने लिहिण्यासाठी DSC (Digital Signature Certificate) उपलब्ध करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक ९ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये विभागीय चौकशी नियमपुस्तिकेची सुधारित आवृत्ती तयार करण्यासाठी श्री.अ.ग.मंडपे, सेवानिवृत्त सहसचिव या तज्ज्ञ व्यक्तीची नेमणूक करण्यात आली आहे.
- दिनांक ७ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर, (उत्तर) पैठण, औरंगाबाद या संस्थेस जून २०१७ ते डिसेंबर २०१७ करिता २०७००७४६ या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ करिता ३६-सहायक अनुदान (अनिवार्य) (वेतन) या उपशीर्षाखाली रु.४३.३३ लाख इतके अनुदान (दुसरा हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक ७ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस जून २०१७ ते डिसेंबर २०१७ करिता २०७००७५५ या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ करिता ३६-सहायक अनुदान (अनिवार्य) (वेतन) या उपशीर्षाखाली रु.४३.३३ लाख इतके अनुदान (दुसरा हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक ११ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील आहार / उपाहारगृहांच्या कार्यान्वितेसाठी लागणाऱ्या कच्चा माल / वस्तू / साहित्य इत्यादीच्या खरेदीसाठी दिनांक १ जुलै २०१७ ते ३० जून २०१८ या कालावधीसाठी गणवेश धुलाईकरिता मे.मयकु प्रसाद लॉण्ड्री / रिकामे डब्बे, गोणी इत्यादींची विक्रीकरिता मे.सहारा स्क्रॅप हॉऊस / राईस कुकर, चपाती प्लेट, गॅस-शेगडी बर्नरची देखभाल व दुरुस्ती तसेच गॅस चेंबर पाईप लाईन देखभालीसाठी मे.सुभाष यादव / साबणपाणी, फिनेल, सोडीयम क्लोराईड इत्यादीसाठी मे.नोथी केमिकल्स यांच्या निम्नतम दराच्या निविदा स्वीकृत करण्यात आल्या आहेत.
- दिनांक २१ ऑगस्ट २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नामनिर्देशनाव्दारे शिफारस होणाऱ्या लघुलेखक, लिपिक-टंकलेखक तथा सहायक कक्ष अधिकारी पदावरील उमेदवारांना मंत्रालयीन विभागात नियुक्त करण्याबाबत सुधारित कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.
- दिनांक २४ ऑगस्ट २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक या संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीव्दारे नियुक्तीसाठी घेण्यात आलेल्या मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१७ करिता सुधारित रिक्त पदांची संख्या निश्चित करण्यात आली आहे.
- दिनांक २४ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये "राज्य वेतन सुधारणा समिती २००८" यांनी शासनास सादर केलेल्या अहवालातील परिच्छेद-३.२४ मध्ये केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने व सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ३ जुलै २००९ च्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय झाल्याच्या (दिनांक १

ऑक्टोबर २००६ ते १ ऑक्टोबर २०१५) कालावधीत आगाऊ वेतनवाढीचा लाभ देण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आला आहे.

- दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीची कार्यपद्धती विहित केली आहे.
- दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागीतील ३३९ लिपिक-टंकलेखकांचा सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१७ चा निकाल जाहिर करण्यात आला आहे.
- दिनांक २९ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये श्री.राधेश्याम मोपलवार, भाप्रसे यांच्याविरुद्ध प्राप्त तक्रारींबाबत चौकशी करण्यासाठी चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

**(ख) प्रशिक्षण**

- दिनांक २२ ऑगस्ट २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा २०१७ चे प्रशिक्षण वर्ग दिनांक ७ सप्टेंबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१७ या कालावधीत परिषद सभागृह, सहावा मजला, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात केले आहे.

**(ग) सरळसेवा नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- दिनांक ४ ऑगस्ट च्या शासन ज्ञापनान्वये सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०१६ च्या प्रतिक्षायादीतून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील सहायक कक्ष अधिकारी पदावर ५ उमेदवारांचे नियतवाटप करण्यात आले आहे.
- ८ कक्ष अधिकाऱ्यांना अवर सचिव पदी, १ सहायक कक्ष अधिकाऱ्याला कक्ष अधिकारी पदी व १ लिपिक-टंकलेखकाला सहायक कक्ष अधिकारी पदोन्नती देण्यात आली आहे.

**(घ) प्रपत्र बढती / प्रपत्र बढतीस मुदतवाढ**

- उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील १ कर्मचाऱ्याला निवडश्रेणी लघुलेखक पदी प्रपत्र बढती देण्यात आली आहे. १ सहसचिवाच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(ङ) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल**

- ३ भारतीय प्रशासन सेवेतील ३ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. अवर सचिव, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारीव व उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील अनुक्रमे ५, १, ३ व १ अशा १० कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.
- कक्ष अधिकारी व सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे १, १ अशा २ अधिकाऱ्यांच्या बदलीस स्थगिती देण्यात आली आहे.
- ३ अवर सचिव, १ कक्ष अधिकारी, ६ सहायक कक्ष अधिकारी, ३ उच्चश्रेणी लघुलेखक व २ निम्नश्रेणी लघुलेखक अशा १५ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यात आले आहेत.

**(च) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- १ उपसचिव, २ अवर सचिव व ३ सहायक अशा ६ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात आली आहे.
- १ उपसचिव, १ अवर सचिव, ५ कक्ष अधिकारी व १ सहायक कक्ष अधिकारी अशा ८ अधिकाऱ्यांना प्रत्यावर्तनानंतर बदलीने पदस्थापना देण्यात आली आहे.
- ३ अवर सचिवांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(छ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक १४ ऑगस्ट २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन उपसचिवांची दिनांक १ जानेवारी २०१७ रोजीची सामाईक ज्येष्ठतासूचीत तात्पुरत्या स्वरुपात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- दिनांक २२ ऑगस्ट २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र सहायक कक्ष अधिकारी यांची दिनांक १ जानेवारी २०१७ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठता सूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २२ ऑगस्ट २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१७ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

***********